ARTHA (Commercial Weekly) Poona 4.

उद्योगधंदे, बँकिंग, अर्थशास्त्र, व्यापार, सहकार, इत्यादि विषयांस वाहिलेलें एकमेव मराठी साप्ताहिक
स्थापना : १९३५

# अर्थ

"अर्थ एव प्रधानः" इति कौटिल्यः अर्थमूलौ धर्मकामाविति
—कौटिलीय अर्थशास्त्र

प्रत्येक बुधवारीं प्रसिद्ध होतें.
वर्गणीचे दर :
वार्षिक : ६ रु.
सहामाही : ३ रु.
किरकोळ : १२ नये पैसे
दुर्गाधिवास, पुणें ४.

LICENCED TO POST WITHOUT PREPAYMENT
Reg. No. B. 3434. Licence No. 53.

वर्ष २४ पुणें, बुधवार तारीख १० डिसेंबर, १९५८ अंक ४५

## विविध माहिती

**चहाच्या दर्जाविषयीं तक्रार**—इजिप्त भारताकडून जो चहा खरेदी करतो त्याचा दर्जा चांगला नसल्यानें इजिप्तमधील ग्राहक असमाधानी आहेत. ह्या बाबतींत टी-बोर्डाशीं व भारत सरकारशीं चर्चा करण्यासाठी इजिप्तचें पांच जणांचें प्रतिनिधिमंडळ दिल्लीला आलें आहे. कलकत्ता येथें इजिप्त आपली एक खरेदी कचेरी उघडणार आहे.

**फ्रान्स-भारत व्यापार**—निर्यात व्यापार वाढविण्याच्या दृष्टीनें फ्रान्स व भारत ह्यांच्या दरम्यान व्यापारी करार होण्याचा संभव आहे. फ्रान्सबरोबर होणाऱ्या व्यापारांत भारताला सध्यां प्रतिकूल तफावतीला तोंड द्यावें लागत आहे. तथापि, गेल्या वर्षी फ्रान्सनें २६ कोटी रुपयांचें कर्ज दिल्यापासून निर्यातींत वाढ होऊं लागली आहे.

**ब्राझिल रशिआची मदत घेणार**—ब्राझिल हा आर्थिक दृष्ट्या अप्रगत देश असून त्याचा विकास करण्यासाठी अमेरिकेसारख्या देशांनीं मदत करणें आवश्यक आहे. तशी मदत अमेरिकेनें देण्याचें टाळलें, तर नाइलाजानें ब्राझिलला रशिआकडे मदतीसाठी हात पसरावा लागेल असें ब्राझिलच्या अध्यक्षांनीं म्हटलें आहे.

**सरकारी करांचा परिणाम**—जालंदर येथील खेळांचें सामान तयार करणाऱ्या उद्योगधंद्यांना सरकारच्या करांमुळें कठीण अवस्था प्राप्त झाल्याची तक्रार पंजाब सरकारकडे करण्यांत आली आहे. अशा प्रकारचे कर मीरतमध्यें घेण्यांत येत नाहींत, असें त्या धंदेवाल्यांच्या संघटनेनें दाखवून दिलें आहे.

**अहमदाबादच्या गिरण्या बंद होणार?** अहमदाबादमधील गिरणीमालक आपल्या गिरण्या १५ दिवस बंद करण्याच्या विचारांत आहेत अशी वार्ता आहे. कापडाचा साठा विकला न जातां पडून असल्यामुळें उत्पादन बंद करण्याचें घाटत आहे. अहमदाबाद येथील गिरण्यांप्रमाणें मुंबईमधील गिरण्याहि बंद करण्यांत येण्याचा संभव आहे.

**मध्यम वर्गीयांसाठी घरें**—मध्यमवर्गीय लोकांना घरें बांधण्यास मदत करण्यासाठी रिझर्व्ह बँकेतर्फे कर्जें देण्याची व्यवस्था करण्याचा विचार काँग्रेसचे वरिष्ठ पुढारी करीत आहेत. हें काम करण्यासाठी बँकेतर्फे एक खातेंच उघडण्यांत येणार आहे. घरबांधणीचा कार्यक्रम सहकारी स्वरूपाचा असला पाहिजे.

**रेडिओच्या परवान्यांची संख्या**— ता. ३० सप्टेंबर १९५८ च्या दिवशीं भारतामधील रेडिओच्या परवान्यांची संख्या १४,४१,५७४ होती. त्यापैकी ५१,२६६ परवाने व्यापारी स्वरूपाचे होते आणि १२,५७,६२८ घरगुती वापरासाठी होते.

**जम्मूंत तेलाचा शोध**—भारताच्या तेल व नैसर्गिक वायु कमिशननें जम्मूच्या कांहीं भागांची खनिज तेलासाठी तपशीलवार पहाणी केली आहे. ह्या भागांतील भूगर्भाची रचना ज्वालामुखीच्या प्रदेशासारखी आहे. जम्मूमधील इतर खनिजांचा शोध लावण्याचे प्रयत्नहि सुरू आहेत. दोन कोळशाच्या खाणी चालूहि करण्यांत आल्या आहेत.

**तांदुळाचें पीक उत्तम**—काश्मीर राज्यांत यंदा भाताचें पीक फारच उत्तम आलें आहे. त्यामुळें तांदुळाच्या वापरावर घालण्यांत आलेले निर्बंध रद्द करण्यांत आले आहेत. गेल्या वर्षी जम्मूमधून फक्त १ लाख मण भात सरकार जमवूं शकलें होतें. चालू सालीं ४ लाख मण भात सरकार घेणार असून त्यांपैकी २ लाख मण जमाहि झाले आहे.

**अमेरिकन यंत्रसामुग्रीची वहातूक**— अमेरिकेकडून भारताला पाठविण्यांत येणारी यंत्रसामुग्री व यांत्रिक हत्यारें ह्यांच्या वहातुकीसाठी अमेरिकेंत नोंदण्यांत आलेल्या बोटीच उपयोगांत आणल्या पाहिजेत असें बंधन आतांपर्यंत होतें. परंतु भारत सरकारच्या विनंतीवरून अमेरिकेच्या एक्सपोर्ट-इंपोर्ट बँकेनें ते कांहींसे रद्द केले आहे.

**सालारजंग ह्यांचे म्युझिअम**—हैद्राबाद येथील सालारजंग म्युझिअम मध्यवर्ती सरकारच्या ताब्यांत देण्याचें ठरलें आहे. मरहूम सालारजंग ह्यांच्या वारसांनीं म्युझिअमसाठी नवी इमारत बांधण्यास १५ लाख रुपयांची जमीन देऊं केली आहे. इमारत बांधण्यासाठी आंध्र राज्य सरकारनें ५ लाख रुपयांची देणगी मंजूर केली आहे.

**हिंदी साहित्यिकाचें स्मारक**—सुप्रसिद्ध हिंदी साहित्यिक प्रेमचंद ह्यांचें स्मारक त्यांच्या जन्मग्रामीं उभारण्याचें काशी नागरी प्रचारिणी सभेनें ठरविलें आहे. स्मारकासाठी १,२०,००० रुपयांचा निधि जमविण्यांत येत आहे. एक अतिथीगृह, वाचनालय आणि म्युझियम स्थापन करण्यांत येणार आहे. त्याशिवाय इतरहि कांहीं योजना आहेत.

**मनाचें स्वतंत्र अस्तित्व**—पाश्चात्य शास्त्रज्ञांच्या मताप्रमाणें माणसाच्या मनाला शरीरनिरपेक्ष स्वतंत्र अस्तित्व नसून तें मेंदूच्या व्यापाराचें फळ आहे. लोणावळा येथील कैवल्यधाम योगाश्रमांत ह्यासंबंधीं सध्यां शास्त्रीय संशोधन करण्यांत येत आहे. लयसमाधींतील आसनस्थ योग्याच्या मेंदूमधील विजेच्या प्रवाहाचा आलेख शास्त्रीय उपकरणांच्या साह्यानें करण्यांत आला आहे.

## द. सातारा जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक लि., सांगली

चेअरमन : श्री. गुलाबराव आर. पाटील, बी. ए., एलएल्. बी.
मॅनेजर : श्री. पी. बी. टाकवेकर, बी. ए., एच्. डी. सी.

बँकेच्या कार्यक्षेत्रांत संपूर्ण दक्षिण सातारा जिल्ह्याचा (कोडोली व रेठरेबुद्रुक येथील सहकारी साखर कारखान्याचे क्षेत्रांतील कांहीं गांवें वगळून) समावेश झालेला आहे. सध्यां जिल्ह्यामध्यें बँकेच्या आठ शाखा चालू असून कडेगांत ता. खानापूर येथेंहि बँकेची शाखा सुरू करण्यांत यावयाची आहे. तसेंच सध्यां इस्लामपूर येथें मुंबई राज्य सहकारी बँकेची शाखा काम करीत आहे. तिचाहि तेथील व्यवहार या बँकेकडे घेण्याचा प्रयत्न चालू आहे. अहवालाचे सालांत "अ" वर्ग सभासदांची संख्या १२७२ झाली आहे. त्यांपैकी ५०९ सहकारी संस्था असून ७६३ व्यक्तिशः सभासद आहेत. "ब" वर्ग सभासदांची संख्या १६९ नें वाढून ती १४०४ झाली आहे. अहवालाचे सालांत शेअर भांडवलामध्यें रु. ३,२५,८२०ची वाढ झाली आहे. ग्रामीण पतपाहणी अहवालाचे शिफारशीस अनुसरून मुंबई राज्य सरकारनें या बँकेचे भांडवलांत चालू सालीं रु. २ लाख गुंतविले आहेत. अहवालाचे सालांत सहकारी साखर कारखान्यांच्या सुमारें ११ लाख रुपयांच्या ठेवी परत द्याव्या लागल्या. कारण दोन साखर कारखान्यांचे उभारणीचें प्रत्यक्ष कार्य सुरू झालें. त्यामुळें त्यांनीं आपल्या मुदत ठेवी काढून घेतल्या. तथापि व्यक्तिशः ठेवींमध्यें सेव्हिंग्ज, मुदतठेव व करंट खात्यामध्यें वाढ झाली असलेनें एकूण ठेवींमध्यें रु. ३९,३५१ ची वाढच दिसून येत आहे. अहवालाचे सालांत खेळत्या भांडवलामध्यें रु. ११,३४,०३८ ची वाढ झाली आहे. सालअखेर ३६२ सोसायट्यांकडे रु. ४२,९२,९८९ साधें कर्ज व पीककर्ज रु. ३,११,२२९ एवढी बाकी आहे.

सेंट्रल वेअरहौसिंग कॉर्पोरेशननें अहवालाचे सालांत सांगली मार्केट यार्डमध्यें एक गोडाऊन सुरू केलें. शेतमालाचा योग्यरीतीनें व आधुनिक पद्धतीनें सांठा करणें हें या गोडाऊनचें प्रमुख कार्य आहे. या गोडाऊनमध्यें ठेवलेल्या मालाची विशेषप्रकारें काळजी घेण्यांत येते. ठेवलेल्या मालाची पावती देणेंत येतें. अशा तऱ्हेच्या पावतीच्या तारणावर कर्ज देणेची सवलत आपल्या बँकेनें तावडतोब सुरू केली व सदर सालांत ९ व्यक्तींनीं रु. १९,०६० व एका सहकारी संस्थेनें सदर पावत्यांच्या तारणावर रु. १३,६०० चीं कर्जे घेतलीं. सालअखेरीस ९ सभासदांकडे रु. १९,१५७ व एका सहकारी संस्थेकडे रु. ८,७०० याप्रमाणें बाकी येणें आहे. वैय्यक्तिक सभासदांना आतां फक्त शेतीमाल व सोनेंचांदी यांचे तारणावरच कर्जे देणेचें बँकेचें धोरण आहे. सालअखेरीस वैय्यक्तिक कर्जखात्यावर रु. २,५८,२३६ एवढी बाकी आहे त्यापैकी रु. ९४,५३४ एवढी थकबाकी आहे. थकबाकीचें येणें रकमेशीं ३६.६ एवढें प्रमाण पडत आहे.

मागील अहवालाचे वेळीं बँकेचें इमारतीचें काम चालूं होतें. अहवालाचे सालांत इमारतीचें काम पूर्ण होऊन बँकेचें ऑफिस इमारतींत आणण्यांत आलें. इमारतीचा उद्घाटन समारंभ रिझर्व्ह बँक ऑफ इंडिआचे डेप्युटी गव्हर्नर श्री. वी. वेंकटअप्पय्या यांच्या हस्तें दि. २३-२-५८ रोजीं करण्यांत आला. अहवालाचे वर्षी बँकेस ४१,८२५ रु. नफा झाला. ४% टक्के डिव्हिडंडला १९,९३० रु. लागले. एकूण ताळेबंद ८१ लक्ष रुपयांचा आहे. त्यापैकी वसूल भांडवल ७,५९,४६० रु. असून गंगाजळी व इतर फंड ह्यांत २,४१,५११ रु. आहेत.


आगामी प्रकाशन

મધુમાલતીનું સૌંદર્ય

मूळ लेखक :
श्री. वा. काळे, संपादक, "अर्थ"
गुजराती अनुवादक:
प्रा. शशिन् ओझा, एम्. ए.
प्रस्तावना :
लेडी प्रेमलीलाबेन ठाकरसी
उप-कुलगुरु, श्री. ना. दा. ठाकरसी महिला विद्यापीठ.

माधवाश्रम लि. भोजनाची व राहण्याची उत्कृष्ट सोय. विवाहकार्यांची संपूर्ण व्यवस्था. गिरगांव, मुंबई ४.






यांत्रिक दृष्ट्या परिपूर्ण व दीर्घकाल टिकाऊ.
आपल्या पिकांची जोपासना करण्यासाठीं एकमेव साधन म्हणजेच किर्लोस्कर पंपिंगसेट. भारतांत सर्वत्र समाधानकारकपणें काम करीत आहेत.
सविस्तर माहितीसाठीं लिहा.
किर्लोस्कर ब्रदर्स लि. किर्लोस्करवाडी, द. सातारा.

# अर्थ

बुधवार, ता. १० डिसेंबर, १९५८





संस्थापक :
प्रा. वामन गोविंद काळे
संपादक :
श्रीपाद वामन काळे


## कंपन्यांच्या कारभाराबद्दल संहिता हवी

मुंबई येथील फोरम ऑफ फ्री एंटरप्राइझ ह्या संघटनेच्या विद्यमानें 'आर्थिक प्रगतीमधील जॉइंट स्टॉक कंपन्यांचें कार्य' ह्या विषयावर व्याख्यानांचें सत्र चालू आहे. ह्या सत्रांत असोसिएटेड कंपनीचे मॅनेजिंग डायरेक्टर श्री. एन्. दांडेकर, कार्यनिवृत्त आय. सी. एस., ह्यांचें भाषण झालें. त्यांच्या व्याख्यानाचा विषय 'कंपन्यांच्या कारभारांतील दानत' असा होता. श्री. दांडेकर आपल्या भाषणांत म्हणाले कीं, प्रत्येक समाजांत कांहीं लोक कधींहि न सुधारणारे आणि भल्याबुऱ्याची तमा न बाळगणारे असतातच. त्यांची गोष्ट वेगळी. पण ते सोडून इतर धंदेवाल्यांनीं व उद्योगपतींनीं एक गोष्ट ओळखली पाहिजे. ती ही कीं गेल्या कांहीं वर्षांत माणसांच्या विचारांत फार मोठा फरक झालेला आहे. कंपन्यांच्या कारभारांविषयीं कांहीं एका प्रकारच्या दानतीची संहिता मान्य करणें अतिशय जरूरीचें झालें आहे. कंपन्यांच्या मालकांविषयींचें अगर भागीदाराविषयींचें कर्तव्य प्रथम आहे. कंपन्यांत गुंतविलेल्या भांडवलाचें संरक्षण करणें, त्याची बळकटी वाढविणें आणि त्यावर वाजवी नफा देणें हें तें कर्तव्य होय. कंपन्यांत काम करणाऱ्या नोकरांना योग्य वेतन देणें, नुकसानभरपाई व इतर सवलती देणें आणि त्यांच्या कामाची परिस्थिति सुखकारक करणें हें दुसरें कर्तव्य आहे. हें कर्तव्य म्हणजे सहृदयता दाखविणें असें नव्हें; तर तें करण्यांत धंद्याचाहि उत्कर्ष आहे. कामगारांना आपली प्रगति करून घेण्यासाठी संधीहि देण्यांत आली पाहिजे. तिसरें कर्तव्य ग्राहकांबद्दलचें. ग्राहकांना चांगल्या दर्जाचा माल वाजवी किंमतीला देण्यांत आला पाहिजे आणि मापहि बरोबर घालण्यांत आलें पाहिजे.

चवथें कर्तव्य सरकारच्या बाबतींतलें. कायदेशीर रीत्या जे कर द्यावयास पाहिजेत ते देण्यांत आले पाहिजेत. करविषयक धोरणाविषयीं सल्ला देण्याचें व वेळप्रसंगीं टीका करण्याचें कामहि बजावण्यांत आलें पाहिजे. कोठलीहि कंपनी ज्या ठिकाणीं आपलें काम करीत असतें. त्या ठिकाणच्या लोकांना कंपनीविषयीं आपुलकी वाटली पाहिजे. कारण, कंपनीला ह्याच लोकांत रोज वावरावयाचें असतें, त्यांना कंपनीविषयीं अभिमान वाटला पाहिजे. धंद्यांच्या संघटनांत लिमिटेड कंपनी ही संघटना आतां दृढमूल झालेली आहे. ह्या संघटनेचे विशिष्ट असे कांहीं प्रश्न आहेत, त्यांचा उगम त्रिविध स्वरूपाचा आहे. लिमिटेड कंपन्यांचे भागीदार संख्येनें पुष्कळ असतात आणि ते भौगोलिक दृष्ट्या विखुरलेले असतात. त्यामुळें कंपनीच्या कारभाराबद्दल पूर्ण व प्रामाणिक माहिती त्यांना उपलब्ध करून देणें अगत्याचें होतें. शिवाय ही माहिती त्यांना समजेल अशा रीतीनें देण्यांत आली पाहिजे. कंपन्यांच्या भागीदारांची जबाबदारी मर्यादित असते. त्यामुळें कंपनीच्या सावकारांचें व सरकारचें हितरक्षण करण्यासाठी कंपनी कायद्यांत बरीच कलमें घालावीं लागलीं आहेत. कंपनीचा कारभार चालविणाऱ्या लोकांवर अनामिकतेचें पांघरूण घालण्यांत आलें आहे. त्यामुळें भागीदारांचें व सावकारांचें गैर कारभारापासून व जाणून बुजून केलेल्या अपकृत्यांपासून रक्षण करण्याची तरतूद करावी लागली. तेव्हां कंपन्यांच्या कारभारांतील दानतीचें सूत्र असें सांगतां येईल कीं, कंपनी कायद्यांत जीं कलमें घालण्यांत आलेलीं आहेत, त्यांचें पूर्णपणें व प्रामाणिकपणें पालन करण्यांत आलें पाहिजे. तसें करण्यात आलें, तरच कंपनी कायद्याचा हेतु सफल होईल.

## बंगालमधील मध्यमवर्ग नष्टप्राय झाला

बंगालमधील मध्यम वर्ग नष्टप्राय होण्याच्या मार्गावर आहे. पण त्याची सद्यःस्थिति समजण्यासाठी ह्या वर्गाच्या सामाजिक उत्क्रांतीचा इतिहास थोडक्यांत पाहिला पाहिजे. ब्रिटिश राज्यकर्त्यांनीं कलकत्ता भारताची राजधानी केल्यावर बंगाली लोकांना इंग्लंडच्या संस्कृतीचें आकर्षण वाटूं लागलें. मध्यम वर्गांतील बुद्धिमंतांत डॉक्टर, वकील, कचेरींत काम करणारे अधिकारी, शिक्षक, इत्यादी तयार होऊं लागले. बंगाल सुपीक होता. खाण्यापिण्याची ददात नव्हती. त्यामुळेंच कीं काय बंगाली लोकांनीं धंदा व व्यापार ह्यांच्याकडे दुर्लक्ष केलें. त्यानंतर कायम धाऱ्याची पद्धत अंमलांत आली. परिणामतः बंगालमध्यें श्रीमंत, जमीनदारवर्ग आणि शहरांतील बुद्धिजीवी वर्ग असे दोनच वर्ग निर्माण झाले. ह्या दोन वर्गांमधील श्रमजीवी वर्ग बंगाल्यांत निर्माण झालाच नाहीं. तो सर्व वर्ग भारताच्या इतर प्रांतांतून आला व स्थानिक झाला. बंगालमधील व्यापार व उद्योगधंदाहि बाहेरच्या लोकांच्या हातीं गेला. राजकीय स्वातंत्र्याची चळवळ सुरू झाल्यावर तिला बंगालमधील लोकांनीं सर्वांत अधिक साद दिली. १९३८ मध्यें नेताजी सुभाषचंद्र बोस ह्यांना काँग्रेसमधून घालवून दिल्यावर बंगाल भारतामधील राजकारणाच्या मुख्य प्रवाहापासून अलग पडल्यासारखा झाला.

साधी रहाणी व उच्चविचारसरणी ह्यांच्या धुंदींत मग्न असलेल्या बंगाली मध्यमवर्गाची आजची स्थिति मात्र अतिशय वाईट आहे. बंगालमधील मध्यमवर्गांत बेकारीचा वणवा पेटलेला आहे. गेल्या वर्षी पश्चिम बंगालमधील उद्योग विनिमय केंद्रांत १,४४,००० बेकारांची नोंद झालेली आहे. चालू वर्षाच्या नोव्हेंबरमध्यें त्यांची संख्या १,९१,००० झाली. पण नोंदलेल्या प्रत्येक बेकारामागें ४ न नोंदलेले बेकार असतात हें लक्षांत घेतलें तर बंगालमधील बेकारांची संख्या १० लाखांच्या घरांत जाईल. इतकी प्रचंड बेकारी इतर कोणत्याहि राज्यांत नाहीं. ह्या दुःखद अवस्थेचीं दोन मुख्य कारणें आहेत. पहिलें कारण म्हणजे औद्योगिक क्षेत्रांत पश्चिम बंगालची झालेली पिछेहाट आणि दुसरें म्हणजे रोजगाराच्या क्षेत्रांतून बंगाल्यांची झालेली उचलबांगडी. कांहीं आंकड्यांवरून परिस्थिति अधिक स्पष्ट होईल. १९४८-५५ ह्या काळांत मुंबई राज्यांतील चालू कारखान्यांची संख्या ३६ टक्क्यांनीं वाढली. पश्चिम बंगालमधील संख्या २७ टक्क्यांनीं वाढली. १९५४–५५ मध्यें बंगालमधील मध्यमवर्गीय धंदेवाल्यांनीं

आपल्या धंद्यांत ३१ कोटी ३७ लाख रुपये गुंतविले होते. १९५७–५८ सालीं ह्याच प्रकारच्या धंद्यांत गुंतविलेलें भांडवल ३·१ कोटींवर आलें होतें. कलकत्ता व त्याच्या आसपास असलेल्या कारखान्यांत काम करणाऱ्या कामगारांत फक्त ३० टक्के लोक बंगालमधील आहेत. बाकीचे परप्रांतीय आहेत. कलकत्त्यामधील मालमत्तेपैकी ३० टक्के मालमत्ता इतर प्रांतांतील लोकांच्या मालकीची आहे. कलकत्त्यामधील बहुतेक म्हणजे ७८ टक्के कुटुंबें मध्यमवर्गीयांचीं आहेत. बिगर-बंगाली कुटुंबांपैकी फक्त २२ टक्के कुटुंबें मध्यमवर्गीय आहेत. ह्यामुळें शारीरिक श्रमाचीं कामें करणारे बहुतेक लोक इतर प्रांतांतील आहेत. कलकत्त्यांत रोजगार असणाऱ्या लोकांपैकी ७३ टक्के लोकांना दरमहा १०० रुपयांपेक्षा कमी पगार मिळतो. १४ टक्के लोकांना १०१ तें २०० पर्यंत वेतन मिळतें. ९० टक्के लोकांना दरमहा २०० रुपयांपेक्षा कमी पगार मिळतो, आणि ह्या लोकांपैकी ९० टक्के लोक बंगालच्या मध्यमवर्गाचे आहेत. ह्यावरून हा वर्ग दारिद्र्यानें पिढून नष्टप्राय होण्याच्या मार्गाला लागला आहे हें स्पष्टच दिसतें.

---

### कोयनेच्या विजेचें वांटप कसें करावें?

"१९६१ च्या एप्रिलमध्यें कोयनेची ६०,००० किलोवॅट वीज प्रथम मिळेल व नंतर टप्प्याटप्प्यानें पहिली योजना पुरी होतांच २,४०,००० किलोवॅट वीज उपलब्ध होईल. आतांच्या कार्यक्रमाप्रमाणें ही वीज प्रथमतः मुंबई–पुणें विभाग व कुलाबा, रत्नागिरी, सातारा, कोल्हापूर व सोलापूर जिल्हे यांना मिळावयाची आहे. मुंबई राज्याचे मुख्यमंत्री ना. यशवंतराव चव्हाण यांनीं नुकतेंच असे उद्गार काढले कीं ज्या भागांत वीज निर्माण होईल व ज्या भागांतून जाईल त्या भागाला अंधकारांत ठेवून मुंबईसारख्या दूरच्या ठिकाणीं प्रकाश व शक्ति मिळता कामा नये. त्या उद्गारांशीं मी सहमत आहें. उत्पादनापैकी विजेचा मोठा हिस्सा या विभागांकरितां राखून ठेवण्यांत आला पाहिजे. या विभागांत किती वीजपुरवठा लागेल याची आंकडेवारी अगोदर काढून नंतरच वांटप केलें पाहिजे. विद्युत्‌शक्ति ही उद्योगीकरणाला प्रेरक आहे. ग्रामीण विभागांत वीज खेळवली गेली तर लहान, मध्यम, मोठे व ग्रामीण उद्योगधंदे उभारले जातील व फोफावतील. विजेचा पुरवठा ग्रामीण जनतेला उपलब्ध केल्याशिवाय त्यांचा विकास होणार नाहीं.

"वीजनिर्मितीच्या आसमंतांत विजेचा विनियोग करण्यांत वीज वाहून नेण्याचा खर्च वाचेल, वहातुकींतील घसारा होणार नाहीं एवढेंच नव्हें तर ग्रामीण विभागांत धंद्यांची धडपड सुरू होऊन कामधंदा व रोजगारी उपलब्ध होईल. औद्योगिक साहसांना वीज सवलतीच्या किमान दरानें देणेंहि आवश्यक आहे. दरमहा १०० युनिटपर्यंत वापरणाऱ्या लहान कुटीरोद्योगांना तर खास दर असावा. खूप वीज लागणाऱ्या अल्युमिनीअमसारख्या धंद्यांच्या दराचें प्रमाणहि खास कमी ठरविणें इष्ट ठरेल.

"कोयनेची वीजनिर्मिति जवळ येत असतांना ती उपलब्ध होण्याकरितां आवश्यक अशी विद्युत्‌वाहक तारा व उपस्टेशनें हें बांधण्याचें काम इलेक्ट्रिक ग्रिडकडे आहे. त्या कामाची प्रगति कार्यक्रमाबरहुकूम नसावी असा अंदाज आहे. वीज तयार होईल पण ही व्यवस्था नसल्यास या विभागांचें नुकसान होणार आहे म्हणून हें कार्य तातडीनें हातीं घ्यावें व वेळींच पुरें होण्याची दक्षता बाळगावी."

(महाराष्ट्र चेंबरच्या ३१ व्या वार्षिक साधारणसभेंत श्री. भा. दि. गरवारे ह्यांचें अध्यक्षीय भाषण.)

## द्विभार्या विवाहाला उत्तेजन

### मुंबई हायकोर्टाचा उद्‌बोधक निवाडा

### अक्षता टाकायला हरकत नाहीं. पानसुपारी वांटा, पण अंतरपाट धरूं नका.

आपली पहिली पत्नी वायडाबाई ही हयात असतांना तिच्या पतीनें कृष्णाबाई नांवाच्या बाईशीं दुसरें लग्न केलें. त्या विवाहप्रसंगीं वधुवराचे नातेवाईक हजर होते. प्रथम पत्नी जिवंत असतांना दुसरें लग्न करणें बेकायदा आहे हें त्यांना माहीत होतें. लग्न लागत असतांना त्या नातेवाइकांनीं वधुवरांवर अक्षता टाकल्या. त्यांपैकी एकानें अंतरपाट धरला आणि दुसऱ्यानें लग्न आटोपल्यावर पानसुपारी वाटली.

द्विभार्या विवाहाला उत्तेजन देणें अथवा मदत करणें या आरोपावरून त्या सर्व नातेवाइकांविरुद्ध पीनल कोड, कलम ४९४ आणि ११४ खालीं खटला भरण्यांत आला.

मॅजिस्ट्रेटनें त्या सर्वांना दोषी ठरवून एक दिवसाची सक्तमजुरी आणि प्रत्येकी १० रुपये दंड अशी शिक्षा ठोठावली. ही शिक्षा अपिलांत सेशन्स जज्जानें कायम केल्यामुळें आरोपींनीं हायकोर्टांत रिव्हिजन–अर्ज केला.

गुन्ह्याला उत्तेजन देणें, कट करणें अथवा जाणूनबुजून मदत करणें हा पीनल कोड, कलम १०७ खालीं गुन्हा आहे. प्रस्तुत केसमध्यें उत्तेजन देणें किंवा कट करणें या गोष्टी नव्हत्या. तेव्हां प्रश्न असा शिल्लक राहतो कीं, आरोपींचें कृत्य द्विभार्या विवाहाला जाणूनबुजून मदत करणें या सदरांत येतें किंवा काय.

वरील आरोपींपैकी सर्वजण द्विभार्या विवाह होत असतांना हजर होते. ते वधुवरांचे नातेवाईक होते. प्रथम पत्नी हयात असतांना दुसरें लग्न करणें बेकायदा आहे हें त्यांना माहीत होतें. असें जरी असलें, तरी केवळ वधुवरांवर लग्न होत असतांना अक्षता टाकणें म्हणजे द्विभार्या विवाहाला मदत करणें होत नाहीं, असा निकाल देऊन हायकोर्टानें वरील कृत्य ज्या आरोपींनीं केलें होतें त्या आरोपींना निर्दोषी म्हणून सोडून दिलें.

आतां ज्या आरोपीनें विवाह होत असतांना अंतरपाट धरला त्या आरोपीचा विचार करूं. प्रथम पत्नी हयात असतांना दुसरें लग्न करणें हें कृत्य बेकायदा आहे हें त्या आरोपीला माहीत असूनसुद्धां त्यानें वधुवरांमध्यें विवाहप्रसंगीं अंतरपाट धरला. आरोपीचें वरील कृत्य द्विभार्या विवाहाला जाणूनबुजून मदत करणें या सदरांत येत असल्यामुळें पीनल कोड, कलम १०७, ११४ आणि ४९४ खालीं हा आरोपी दोषी ठरतो, असा निकाल हायकोर्टानें दिला.

आतां ज्या आरोपीनें विवाह आटोपल्यावर निमंत्रितांना पानसुपारी वाटली त्या आरोपीचा विचार करूं. हें कृत्य द्विभार्या विवाहाला मदत करणें या सदरांत येत नाहीं. कारण पानसुपारी वाटल्यामुळें द्विभार्या विवाह घडून आला असें होत नाहीं. सबब वरील आरोपी निर्दोषी असून त्याला सोडून देण्यांत यावें असा निकाल हायकोर्टानें दिला.

द्विभार्या विवाह करणें बेकायदा आहे हें माहीत असून त्या लग्नप्रसंगीं हजर राहून वधुवरांवर अक्षता टाकणें हें कृत्य द्विभार्या विवाहाला मदत करणें या सदरांत येत नाहीं.

तसेंच विवाह लागल्यानंतर निमंत्रितांना पानसुपारी वाटणें हें कृत्यहि द्विभार्या विवाहाला मदत करणारें कृत्य ठरत नाहीं.

प्रथम पत्नी हयांत असतांना दुसरें लग्न करणें कायद्यानें बेकायदा ठरविलें आहे हें माहीत असूनसुद्धां जर एखाद्यानें त्या लग्नप्रसंगीं वधुवरांमध्यें अंतरपाट धरला, तर तें कृत्य द्विभार्या विवाहाला जाणूनबुजून मदत करणें या सदरांत येतें. (न्यायबोध)

**नेपा मिल्सचें भांडवल वाढविणार**—नेपा मिल्स ही न्यूजप्रिंट तयार करणारी भारतांतील पहिली गिरणी आहे. तिच्यांत सध्यां दररोज ६५ टन न्यूजप्रिंट तयार होतो. चांदणी येथील पॉवरहाऊस १ कोटी रु. खर्चून वाढविण्यांत आलें, म्हणजे गिरणी दररोज १०० टन न्यूजप्रिंट तयार करूं लागेल. त्यामुळें भारतांतील न्यूजप्रिंटची ३३% मागणी पुरी पडूं शकेल व दरसाल १३ कोटी रुपये परदेशी हुंडणावळ वाचेल. प्रत्येकीं १० रुपयांचे ३५,९७,२९० शेअर्स विक्रीस काढून भांडवल वाढविण्यांत येणार आहे.

**साखरेच्या कारखान्याची यंत्रसामुग्री**—साखरेच्या कारखान्यासाठी लागणारी यंत्रसामुग्री देशांतच तयार करण्यासाठी कांहीं कारखानदारांची एक संयुक्त संघटना उभारण्यांत येणार आहे. ही सघटना साखरेचे संपूर्ण कारखाने येत्या दोन वर्षांत बनवूं लागेल. फक्त कांहीं भाग परदेशांतून आयात करावे लागतील.

**हुंडा बेकायदा करणारें बिल**—विवाहाचे वेळीं हुंडा देणें किंवा घेणें बेकायदा करणारें एक बिन-सरकारी बिल श्री. जुगल किशोर ( काँग्रेस ) ह्यांनीं राज्यसभेंत मांडलें आहे. गुन्हेगारास एक वर्षापर्यंत कैद अथवा दंड, अशा शिक्षेची बिलांत तरतूद आहे.

**कापड गिरण्यांत स्वयंचलित माग**—कापड गिरण्यांत स्वयंचलित माग बसविण्यास मध्यवर्ती कामगार संघटनांच्या मुख्य पुढाऱ्यांनीं मान्यता दिली आहे. योजनेप्रमाणें १९६१ सालपर्यंत दरसाल २,५०० स्वयंचलित माग बसविण्यांत येणार आहेत. कापडाची निर्यात वाढविण्यासाठी हे माग बसविण्यांत येणार आहेत.

**सरस्वती बँक लि. ला लायसेन्स नाकारला**—सरस्वती बँक लि., गुलबर्गा, ह्या बँकेस रिझर्व्ह बँकेनें लायसेन्स नाकारला आहे. ह्याचा अर्थ, तिला बँकिंगचा व्यवसाय करता येणार नाहीं. ह्या बँकेची स्थापना १९२२ सालची आहे. ५ लक्ष, १३ हजार रु. वसूल भांडवल; ८ लक्ष, ८८ हजार रु. ठेवी; १ लक्ष, २० हजार रु. तोटा; १३ लक्ष, ४६ रु. कर्जें; असे तिचे व्यवहाराचे आंकडे आहेत.

**पाकिस्तानांतून विमानानें बाहेर जाणारावर कर**—विमानानें पाकिस्तानांतून परदेशीं जाणारांवर पाकिस्तान सरकारनें प्रत्येकी ५ रुपये कर बसविण्याचें ठरविलें आहे. १ जानेवारीपासून तो अंमलांत येईल. विमान वहातूक कंपन्यांनीं तो वसूल करून सरकारला द्यावयाचा आहे.

**सरकारी कंपन्यांच्या नांवांतील "प्रायव्हेट" शब्द**—प्रायव्हेट लिमिटेड कंपन्या म्हणून नोंद झालेल्या कंपन्यांनीं त्यांच्या नांवामध्यें "प्रायव्हेट" हा शब्द ठेवलाच पाहिजे अशी तरतूद कंपनीज ॲक्ट, १९५६ या कायद्याच्या १३ व्या कलमांत आहे. ह्या तरतुदींतून सरकारी कंपन्यांना वगळण्यांत यावें, असें ठरविण्यांत आलें आह.

**मद्रास राज्यांत नव्या गिरण्या**—मद्रास राज्यांत सूत कातण्याच्या दोन नव्या गिरण्या उघडण्यांत येणार आहेत. सिलोनमधून परत धाडण्यांत आलेल्या हिंदी नागरिकांना काम देण्यासाठी त्या मुद्दाम काढण्यांत येत आहेत. प्रत्येक गिरणींत सूत कातण्याच्या १२,००० चात्या असतील. त्याशिवाय सहकारी तत्त्वावर चालविण्यांत येणारी एक गिरणी ह्यापूर्वींच चालू करण्यांत आली आहे.


दक्षिण भारतांतील जुनी व नाणावलेली बँक

# दी इंडियन बँक लि., मद्रास

( स्थापना : १५ ऑगस्ट १९०७ )

या बँकेची पुणें शाखा २४८ बुधवार पेठ, पुणें २. ( पुणें नगर वाचन मंदिरासमोर )
दि. १७-११-५८ पासून उघडण्यांत आली आहे.

| | रु. | | रु. |
|---|---|---|---|
| अधिकृत भांडवल | १,००,००,००० | रिझर्व फंड व इतर रिझर्व | ६०,४४,५८४ |
| खपलेलें भांडवल | ७२,००,००० | ठेवी | ३८,००,९६,४१५ |
| वसूल झालेलें भांडवल | ६६,१९,६२५ | रोख्यांतील गुंतवणूक | ९,८५,११,५२३ |
| शेअर प्रीमिअम | ३१,१७,३०० | खेळतें भांडवल | ४६,०५,११,८१२ |

★ बँकेंत चालू, सेव्हिंग्ज व मुदतीच्या ठेवी स्वीकारण्यांत येऊन बँकिंगचे सर्व प्रकारचे व्यवहार केले जातात.
★ गेले वर्षी ( १९५७ ) १५% दरानें डिव्हिडंड दिले आहे.
★ तपशीलवार माहितीकरितां शाखाकचेरींत समक्ष भेटावें अगर पत्रव्यवहार करावा.

सी. एस्. नागराज रावसाहेब.
एजंट, पुणें शाखा.

## राज्यांच्या सहकार खात्यांच्या रजिस्ट्रारांच्या बैठकीनें केलेल्या शिफारशी

सहकारविषयक धोरण आणि सहकारी चळवळीचा विस्तृत प्रमाणावर प्रसार करण्यासंबंधींचा राष्ट्रीय विकास मंडळाचा ठराव, राज्यांचीं सहकारी खातीं सर्व पातळीवर बळकट करणें किती जरूरीचें आहे ही गोष्टच दर्शवीत असल्याचें येथें सांगण्यांत येत आहे.

सहकारी खात्यांतील नोकरांचे पगार आणि नोकरीविषयक अटी महसूल आणि शेतकी यांसारख्या इतर खात्यांतल्या नोकरां-प्रमाणेंच असाव्यात. शिवाय सहकारी खात्याच्या रजिस्ट्रारांना सल्ला देण्याकरितां त्यांच्या केंद्रकचेरींत खास व तांत्रिक अधिकारी नेमण्यांत यावेत. या खात्यांत आंकडेवारी विभागहि असावेत.

मध्यवर्ती अन्न व शेतकी खात्यानें बोलाविलेल्या राज्यांच्या सहकारी खात्यांच्या रजिस्ट्रारांच्या बैठकींत वरीलसारख्या कांहीं सूचनांस सर्वसाधारण मान्यता मिळाली. सहकारी विकास कार्यक्रमांत शिक्षणास महत्त्वाचें स्थान असून रिझर्व्ह बँकेनें आणि अ. भा. सहकार संघटनेनें शिक्षणाच्या कार्यक्रमाचा वेग वाढवून अशा शिक्षितांची संख्या वाढविण्याची सोय करावी, अशी शिफारस करण्यांत आली.

प्राथमिक सोसायट्यांची सदस्यसंख्या वाढविण्याच्या लक्ष्यांच्या आणि कर्जपुरवठ्याच्या संदर्भांत या परिषदेंत असें मत व्यक्त करण्यांत आलें कीं, सहकारी खरेदी–विक्री, साफसफाई आणि सांठवण याबाबतचा कार्यक्रम अधिक झपाट्यानें खुद्द १९५९-६० मध्येंच अंमलांत आणला पाहिजे. याकरतां अधिक निधि मंजूर करावा लागेल. सहकारी संस्थांची स्थापना व कर्जमंजुरी याबाबतची विद्यमान पद्धति सुटसुटीत करण्याची आणि सध्यांच्या सहकारी कायद्यांतील कांहीं विशिष्ट बंधनें दूर करण्याची गरज आहे, असेंहि मत व्यक्त करण्यांत आलें. राष्ट्रीय विकास मंडळानें संकल्पिलेल्या नव्या कार्यक्रमाचा विकास करून प्रचलित कायदे आणि पद्धति यांत स्थानिक परिस्थितीनुसार कशा रीतीनें बदल करावा हें राज्यांनीं ठरवावयाचें आहे.

सहकारी संस्थांमार्फत मिळणारीं कर्जें आणि तगाई कर्जें यांच्यांत सुसूत्रता आणण्याच्या प्रश्नावर या बैठकीनें पुढील शिफारशी केल्या:— (१) आपत्तीच्या प्रसंगीं मिळणारीं कर्जें सरकारनेंच द्यावींत आणि तीं कर्जें सहकारी संस्थांच्या कर्जाच्या कक्षेंत येऊं नयेत, (२) उत्पादन तगाईची रक्कम मात्र सहकारी संस्था, कर्ज देणाऱ्या संस्था यांच्या हवालीं करण्यांत यावी, आणि (३) सहकारी संस्थांनीं शेतकऱ्यांना सहकारी कर्जें म्हणून कर्जें द्यावींत आणि अशा सहकारी संस्थांनीं सर्व कर्जदारांसाठी व्याजाचा दर सारखाच ठेवावा.

वस्तूंच्या किंमती स्थिर ठेवण्यासाठी सहकारी खरेदी–विक्री संस्थांचा विकास करणें आणि कर्जपुरवठ्याच्या सवलती वाढविण्याचा, कर्जाचा व खरेदी–विक्रीचा संबंध ठेवणें यास राष्ट्रीय विकास मंडळाकडून जें महत्त्व देण्यांत आलें त्याचीहि दखल या बैठकींत घेण्यांत आली. यापूर्वींच स्थापन झालेल्या एक हजार खरेदी–विक्री सोसायट्यांना त्या ज्या विभागांत काम करतात त्या विभागांतील धान्य वसूल करणारे एजंट म्हणून नेमण्यांत यावें अशी शिफारस करण्यांत आली. विशेषतः, अन्नपिकांच्या प्रक्रियेसाठी सहकारी तत्त्वाचा अवलंब करण्यांत यावा आणि परवाने देतांना ही क्रिया करणाऱ्या सहकारी संस्थांना प्राधान्य मिळावें अशी शिफारस या परिषदेनें केली आहे. सहकारी साखर कारखानें वगळून प्रक्रिया करणाऱ्या इतर सहकारी संस्थांना व्यवस्थापकीय नोकरवर्ग व तंत्रज्ञ यांच्या नेमणुकीसाठी आर्थिक साह्य मंजूर करण्यांत यावें. असें साह्य खरेदी–विक्री आणि प्रक्रिया हीं कामें करणाऱ्या सहकारी संस्थांस दिलें जावें, अशाहि कांहीं शिफारसी या बैठकींत करण्यांत आल्या.

सहकारी शेतीचे बाबतींत, अल्प मुदतीचें कर्ज देणाऱ्या पतपेढ्यांची गरज, मोठ्या प्रमाणावर भांडवलाची व्यवस्था आणि तांत्रिक व व्यवस्थापकीय नोकरवर्गासाठी मदत इत्यादि गोष्टींचा विचार करण्यांत आला. अल्पमुदतीच्या कर्जाबाबत असा विचार झाला कीं, सहकारी शेती–संस्थांस सहकारी पतपेढ्यांप्रमाणेंच वागविण्यांत यावें. मोठ्या प्रमाणावरील भांडवलासाठी मध्यम मुदतीच्या कर्जाचा विचार करतां, मध्यवर्ती सहकारी बँकांनीं दिलेल्या कर्जांतील बुडणाऱ्या कर्जाच्या कांहीं भागाची राज्य सरकारांनीं हमी द्यावी असें ठरलें. इतर मदतीचे बाबतींत सहकारी शेतकी संस्थांस आर्थिक व तांत्रिक मदत द्यावी; त्याचप्रमाणें व्यवस्थापकिय नोकरवर्गावरील आणि नोकरवर्गाच्या शिक्षणावरील सर्व खर्च देण्यासाठींहि सरकारनें आर्थिक साह्य द्यावें असें मत व्यक्त करण्यांत आलें.

---

## हैद्राबाद चलनाचें भारतीय चलनांत रूपांतर

भारत सरकारनें हैद्राबाद चलनाचें भारतीय चलनांत रूपांतर करून घेण्याची सवलत दिली होती; ती ३१ डिसेंबर, १९५६ रोजीं संपुष्टांत आली. तेव्हांपासून भारत सरकार, राज्य सरकारें, रिझर्व्ह बँक, स्टेट बँक ऑफ हैद्राबाद यांच्याकडे लोकांकडून विशेषतः ग्रामीण विभागांतील मंडळींकडून अनेक अर्ज येत आहेत. कोणत्या तारखेपर्यंत हैद्राबाद चलनाचें रूपांतर करून घेण्याची सवलत होती हें माहीत नसल्याचें त्यांचें, बहुतेकांचें म्हणणें आहे. ही तक्रार वाजवी वाटल्यामुळें रूपांतराची सोय सवलत ठराविक पद्धतीप्रमाणें मर्यादित कालापुरती परत चालू ठेवण्याचा निर्णय भारत सरकारनें घेतला आहे. ही योजना १ डिसेंबर, १९५८ पासून प्रत्यक्षांत येईल व ३० जून, १९५९ पर्यंत अंमलांत राहील. ह्या योजनेनुसार स्टेट बँक ऑफ हैद्राबादच्या जवळच्या शाखेंत ठराविक नमुन्याच्या तीन प्रति भरून संग्रहींचें चलन बदलून घेण्यासाठी अर्ज करतां येईल. ह्या बँकेच्या कोणत्याहि शाखेंत अर्जाचे नमुने मिळूं शकतील. रिझर्व्ह बँक ह्या अर्जाचा गुणवत्तेनुसार विचार करील व तिनें मान्यता दिल्यावर स्टेट बँक ऑफ हैद्राबाद चलन वळतें करून देईल. ही सोय-सवलत ३० जून, १९५९ नंतर कायमची काढून घेतली जाणार असल्यामुळें ह्या मुदतीच्या आंत शक्य तितक्या लवकर प्रमाणभूत दरानें (भारत सरकारचे रु. १०० बरोबर ओ. एस. चलनाचे रु. ११६–१०–८) ज्यांच्या जवळ हैद्राबाद चलन असेल त्यांनीं तें भारतीय चलनांत बदलून घ्यावें.

दातांच्या स्वच्छतेसाठी
★ माकडछाप म्हणजेच काळी टूथ पावडर ★

# डिझेल एंजिन–निर्मितीचा रजतमहोत्सव

## कूपर एंजिनियरिंग लिमिटेडचीं २५ वर्षे

सातारा रोड येथील कूपर एंजिनिअरिंग लिमिटेड या कारखान्याचा डिझेल एंजिन उत्पादनाचा रौप्यमहोत्सव रविवार दि. २३ नोव्हेंबर रोजीं मोठ्या थाटानें साजरा करण्यांत आला. ज्यांच्या दीर्घोद्योगामुळें, कल्पकतेमुळें आणि धडाडीनें या कारखान्याची एवढी भरभराट झाली त्या मरहूम सर धनजीशहा कूपर यांच्या पुतळ्याचें त्यांच्याच कर्मभूमींत या प्रसंगीं अनावरण करण्यांत आलें.

या देशांत २५ वर्षापूर्वीं डिझेल एंजिनांच्या उत्पादनाला सुरुवात झाली. या बाबतींत मरहूम सर धनजीशहा कूपर यांच्या हिंदुस्थान एंजिनिअरिंग आणि इम्प्लीमेंट कंपनीनें पुढाकार घेतला होता आणि त्या कामीं त्यांनीं मेसर्स डंकन स्ट्रॅटन अँड कंपनीचें सहकार्य मिळविलें होतें. सातारा रोड येथें या कंपनीनें १९३३ सालीं डिझेल एंजिनांच्या उत्पादनास सुरुवात केली. पहिलें एंजिन १५ हॉर्स पॉवरचें होतें. हीं एंजिनें व्यापार व उद्योगक्षेत्रांतील सर्व वर्गांत अल्पावधींत अत्यंत लोकप्रिय झालीं आणि कंपनीच्या एंजिनांच्या मागणीमध्यें एकसारखी वाढ होत गेली. पुढील वर्षींच कंपनीनें ७, ९३, १२ व १८ हॉर्स पॉवरचीं एंजिनें तयार करण्यास सुरुवात केली.

मालाला मागणी एकसारखी वाढूं लागल्यामुळें कंपनीच्या उत्पादनांत वाढ करणें अत्यंत जरूरीचें वाटूं लागलें. सर धनजीशहा यांना १९४० सालीं त्यांच्या कार्यांत कै. वालचंद हिराचंद यांचें सहकार्य प्राप्त झालें आणि लगेच कूपर एंजिनिअरिंग लिमिटेडची स्थापना करण्यांत आली. त्यापाठोपाठ कारखान्याचें उत्पादन वाढविण्याची विस्तृत योजना आखण्यांत येऊन लगेच कार्यवाही करण्यांत आली. तेव्हापासून या कारखान्याची प्रगति अव्याहत चालू असून, पांच आणि त्यापेक्षा जास्त हॉर्सपावरचीं निरनिराळ्या १६ प्रकारांचीं डिझेल एंजिनें तयार करणारा एक सर्वोत्तम कारखाना असा या कारखान्याचा लौकिक प्रस्थापित झाला.

### २५ हजार एंजिनांची निर्मिति

या गेल्या २५ वर्षांत कंपनीनें २५ हजार एंजिनें तयार केलेलीं आहेत. अगदीं पहिल्या वर्षांत जीं एंजिनें तयार करण्यांत आलीं तीं आजच्या घटकेलाहि काम देत आहेत. यावरून या कारखान्यांत उत्पादन झालेला माल किती श्रेष्ठ दर्जाचा होता याची खात्री पटते.

गेल्या दोन वर्षांत कंपनीनें आणखी एक पाऊल पुढें टाकून एंजिन–उत्पादनाचें प्रमाण दुपटीनें वाढविलें आहे. कूपर कारखान्यांत १९२२ सालीं ५० कामगार होते, आजच्या घटकेला या कारखान्यांत दोन हजार कामगार कामावर आहेत. यावरून कंपनीच्या कामाचा व्याप केवढा वाढला आहे याची कल्पना येईल.

एंजिनांमध्यें नित्य नव्या सुधारणा करण्याकडे कंपनीचें सदैव लक्ष असतें. कारखान्यांत तयार होणाऱ्या एंजिनांमध्यें रिकार्डो कोमेट कम्बशन सिस्टिमचा अंतर्भाव करण्यासाठी त्यासंबंधीचे सर्व अधिकार कंपनीनें कांहीं वर्षांपूर्वींच इंग्लंडमधील मेसर्स रिकार्डो अँड कंपनी एंजिनिअर्स लिमिटेड यांच्याकडून मिळविले आहेत.

डिझेल एंजिनांबरोबर या कारखान्यांत मशीन टूल्सचें उत्पादन चालूं आहे. आपल्या कारखान्यांत तयार होणारीं मशीन टूल्स उत्कृष्ट प्रतीचीं बनावीं म्हणून कंपनीनें परदेशांतील अनेक तज्ज्ञांच्या सल्लामसलतीचा लाभ घेतलेला आहे. कारखान्यांत सध्यां पहिल्या ग्रेडच्या स्टँडर्डचीं शेपिंग मशीन्सहि तयार होत असून बाजारपेठेंत त्यांची मोठ्या प्रमाणावर विक्री चालू आहे. कांहीं परदेशी कारखानदारांच्या सहकार्यानें प्लेनिंग आणि स्लॉटिंग मशीन्स तयार करण्याची तयारीहि कंपनीनें सध्यां चालविली आहे.

कूपर एंजिनिअरिंगच्या कारखान्यांतील फौंड्री सुद्धां सर्व प्रकारच्या साधनसामुग्रीनें सुसज्ज अशीच आहे. या फौंड्रींत त्यांचें कास्टिंगचें काम तर होतेंच, पण देशांतील अनेक कारखान्यांचें कास्टिंगचें काम या फौंड्रीमध्यें सध्यां करून देण्यांत येत आहे.

### सातारा जिल्ह्याच्या औद्योगीकरणाचा प्रारंभ

सर धनजी बमनजी कूपर हे १९३७ मध्यें मुंबई प्रांताचे मुख्य मंत्री होते. राजकारणाबरोबर गरीब शेतकरी समृद्ध कसा होईल याची योजना त्यांनीं आखली आणि सातारा जिल्ह्यांतील औद्योगीकरणाची मुहूर्तमेढ रोवून ती मोठ्या चिकाटीनें व हिरीरीनें यशस्वी करून दाखविली. सातारा जिल्ह्यांतील शूर लोकांची कर्तृत्वशक्ति उत्तम शेती आणि कारखानदारीस योग्य मार्गदर्शन केल्यास उपयोगी पडूं शकेल असा त्यांना गाढा विश्वास होता व त्या दृष्टीनेंच त्यांनीं आपलीं पावलें टाकण्यास सुरुवात केली.

त्या काळीं शेतकरीवर्गाकडून सुधारलेलीं शेतीचीं लोखंडी अवजारें व यंत्रें यांचा वापर फारच कमी म्हणजे अवघा ५ टक्के केला जात असे. म्हणून कच्चा माल व बाजारपेठ नसतांना, १९२२ सालीं शेतीचीं अवजारें व यंत्रें तयार करण्याचा लोखंडी कारखाना पूर्वींच्या पाडळी स्टेशनच्या या परिसरांत दिवाळीच्या सुमारास सुरू केला. अशा तऱ्हेनें "सातारा इंडस्ट्रीयल वर्क्स" च्या रूपानें त्यांनीं इंजिनिअरिंग कारखानदारीच्या क्षेत्रांत धडाडीचें पाऊल टाकलें. त्यावेळीं कंपनीमध्यें फक्त २० लोक कामावर असत व त्यांचा महिन्याचा एकूण पगार ७०० रुपयांपर्यंत असे. कारखान्याचें उत्पादन दरमहा ६० टनांपर्यंत असे व त्यांत मुख्यतः शेतकऱ्यास उपयोगी पडणारे निरनिराळ्या जमिनींत चालणारे नांगर, चरक, मोटांचीं चाकें, रहाट, बाकें व कढई हाच माल असे. "सातारा इंडस्ट्रियल वर्क्स" चें १९२८ मध्यें "कूपर इंजिनिअरिंग वर्क्स" मध्यें रूपांतर झालें. नंतर कारखान्यांत वजनमापांची निर्मिति सुरू झाली. १९३६ अखेर सर धनजीशहा मंत्रिमंडळांत गेल्यावर कारखान्याची व्यवस्था नरीमन शेटजी पाहूं लागले.

### बीजांकुराचा विस्तार

कारखान्याची १९२२ सालीं अगदीं लहानशा जागेवर सुरुवात झाली. आज कारखान्याचा व्याप सुमारें १०० एकर जमिनीवर पसरलेला आहे. कारखान्यांतील यंत्रसामुग्री अगदीं अद्यावत् असून शिवाय कारखान्यांत काम करणाऱ्या ६०० कुटुंबांना राहण्यासाठी सर्व सुखसोयींनीं परिपूर्ण असलेली अशी कॉलनीहि कारखान्याजवळच आहे. सध्यां कारखान्यांत सुमारें २ हजार लोक कामावर असून, त्यांचा दरमहा पगार दीड लाख रुपयांच्या घरांत आहे. कारखान्याचें उत्पादन दरमहा बारा लाख रुपयांच्या घरांत असून, या वर्षीची विक्री १ कोटि, १५ लाख रुपयांतर गेली आहे.

उत्पादनाच्या वाढीबरोबर त्यांतील विविधतेमध्येंहि पुष्कळच भर पडली आहे. सुरुवात शेतीचीं अवजारें व यंत्रें यांपासून झाली तरी त्यांत आतां प्रामुख्यानें ऑईल एंजिनांच्या उत्पादनाची वैशिष्ट्यपूर्ण भर पडली आहे. सध्यां कारखान्यांत ५ हॉर्सपॉवरपासून २५६ पर्यंत आडव्या बांधणीची तशीच कांहीं उभ्या बांधणीचींहि यंत्रें तयार होतात. पांच हॉर्सपॉवरचीं एंजिन्स तयार करण्याचें कामहि लवकरच हातीं घेतलें जाणार आहे. नुकतेंच कंपनीनें रिकार्डो आणि कंपनी, ससेक्स, लंडन येथील कंपनशिीं करार करून त्यांची कॉमेट चेंबर नांवानें ओळखली जाणारी नवीन सुधारणा आपल्या कूपर रिकार्डो सी. आर. सीरीज एंजिन्समध्यें समाविष्ट केली आहे व त्यामुळें एंजिन्सच्या आयुर्मर्यादेंत वाढ तर झाली आहेच, पण तेलाचा खर्चेंहि पुष्कळच कमी झाला आहे. या सुधारणेमुळें एंजिनांच्या भागांची झीजहि कमी प्रमाणांत होते. या सर्व गोष्टींमुळें कंपनीचीं एंजिनें अत्यंत लोकप्रिय झाली असून, देशांतील ग्राहकांबरोबरच ब्रह्मदेश, मलाया, सिलोन, फिलीपाइन्स इत्यादि परदेशांतील व्यापाऱ्यांकडून या इंजिनांना वाढती मागणी येत आहे.

१९४० सालच्या सुमारास कारखान्यामध्यें युद्धकाळीं शेपिंग मशीन्स, लेथ्स, ड्रिलिंग मशीन्स, बनविण्यांत येऊं लागली व लवकरच त्यांत पॉवरलूम्सची भर टाकण्यांत आली. कारखाना २३।५।१९४० पासून "कूपर एंजिनिअरिंग लिमिटेड" या नांवाखाली वालचंद उद्योगसमूहांत समाविष्ट करण्यांत आला. या बदलाबरोबरच कारखान्यांत नवीन यंत्रसामुग्री आली, निरनिराळ्या शाखांचा झपाट्यानें विस्तार सुरू झाला आणि उत्पादनांत नवे टप्पे गाठण्यास कंपनीनें सुरुवात केली. मिहनाइटचें कास्टिंग ही तर कारखान्याची एक वैशिष्ट्याची बाब होऊन बसली आहे आणि हिंदुस्थान सरकारच्या मशीन-टूल्सच्या कारखान्यालाहि याच कारखान्यांतून मिहनाइट कास्टिंग्ज पुरविलीं जात आहेत.

सर धनजीशहा कूपर, नरीमन शेठजी, शेठ वालचंद हिराचंद यांच्यानंतर कारखान्याची सूत्रें आतां श्री. भारत गुलाबचंद यांच्या हातीं आलीं आहेत. मालाचा दर्जा आणि उत्पादनांतील सुसूत्रता वाढविण्याच्या कामीं त्यांनीं अत्यंत परिश्रम घेतलेले असून कारखान्याच्या आजपर्यंतच्या लौकिकांत फार मोठी भर घातली आहे. याच कंपनीची मशीनटूल्स बनविण्याची एक शाखा लवकरच पुण्याजवळ चिंचवड येथें सुरू होणार असून कारखान्यास भारत सरकारकडून मंजुरी मिळाली आहे. कंपनीच्या कामांत आणखी सुधारणा करण्याचे प्रयत्न सतत चालू आहेत व त्यासाठींच कंपनीचे डायरेक्टर शेठ भारत गुलाबचंद नुकताच परदेशचा दौराहि करून आले आहेत.

**मेसर्स आर. आर. नाबर आणि कं. चा सुवर्णमहोत्सव**

मेसर्स आर. आर. नाबर आणि कंपनी ह्या शेअर, स्टॉक, फिनॅन्स ब्रोकर कंपनीचा सुवर्णमहोत्सव बुधवार, दि. १७ रोजीं सायंकाळीं ५-३० वाजतां मुंबई येथें ताजमहाल हॉटेलच्या बॉल रूममध्यें बॉंबे स्टॉक एक्सचेंजचे अध्यक्ष, श्री. के. आर. पी. श्रॉफ, ह्यांच्या अध्यक्षतेखाली साजरा होणार आहे.

**भारताच्या वर्गणींत वाढ**—आंतरराष्ट्रीय नाणेनिधीचे सभासद असणाऱ्या देशांनीं आपल्या वर्गणींत ५० टक्के वाढ करावी असें ठरविण्यांत आलें होतें. भारत सरकारने ह्या वाढीला मंजुरी दिली आहे.

## दि बेळगांव पायोनियर अर्बन को. ऑ. बँक लि.

चेअरमन : श्री. बी. बी. पोतदार, बी. ए., एलएल. बी.
मॅनेजर : श्री. पी. जी. कामत, बी. कॉम.

वरील बँकेचें वसूल भांडवल २,९९,३९० रु. असून रिझर्व्ह फंड ४,३०,००० रु. चा आहे आणि इतर फंड १,९७,४८५ रु. चे आहेत. ठेवी १९,७०,१४९ रु. च्या आहेत. म्हणजे, ठेवींच्या निम्म्यानें बँकेचें स्वतःचें भांडवल व फंड आहेत. बँकेनें ८,६५,५७९ रु. रोख्यांत व १५,८७,२१६ रु. व्यक्तिशः कर्जांत गुंतविलेले आहेत. अहवालाचे वर्षी बँकेस ५४,५७३ रु. नफा झाला. ६¼% डिव्हिडंडला १८,७१२ रु. लागले. २०,००० रु. रिझर्व्ह फंडांत टाकण्यांत आले. बुडित व संशयित फंडांत १,९५० रु. घालून तो १,०२,००० रु. वर नेण्यांत आला. सुमारें १०½ हजार रु. नफा तसाच पुढें ओढण्यांत आला आहे.

**जुन्या मोटारी फुंकून टाकल्या**—ब्रिटनमधील वोल्व्हर हॅमटन येथील एका मोटार-कंपनीनें युद्धपूर्वकाळांत तयार केलेल्या पांच मोटारी दर मोटारीमागें २० शिलिंग घेऊन विकून टाकल्या. रुपयांच्या चलनांत ही किंमत अवघी १३ रुपये होते. मोटार घेणाऱ्या पहिल्याच ग्राहकानें मोटार हप्त्यानें देण्यांत येईल काय म्हणून पृच्छा केली. पण ती नाकारण्यांत आली.

**बंद पडलेला साखरेचा कारखाना**—घोलवाड जिल्ह्यांत घोला ह्या ठिकाणीं कांहीं वर्षांपूर्वी एक साखरेचा कारखाना काढण्यांत आला होता. कारखाना नीट न चालल्यामुळें बंद करण्यांत आला होता. स्थानिक शेतकऱ्यांनीं तो सहकारी तत्त्वावर चालविण्यास घेण्याची तयारी दाखविली आहे. त्यासाठीं ते २॥ लाख रुपयांचे भाग घेण्यास तयार आहेत.

**रशिआकडून बेनझिनची खरेदी**—अमेरिकेंतील एका रासायनिक कंपनीनें रशिआकडून बेनझिन विकत घेण्याचें ठरविलें आहे. १९५९ व १९६० ह्या सालीं ही कंपनी रशिआकडून २.७ कोटी टन बेनझिन विकत घेणार आहे. अमेरिकेंत तयार होणाऱ्या बेनझिनच्या किंमतीपेक्षा रशिआची किंमत थोडी स्वस्त आहे. शिवाय अमेरिकेंतील पुरवठा अनिश्चित आहे.

**जगदीशचंद्र बोस ह्यांची जन्मतिथि**—सुप्रसिद्ध हिंदी शास्त्रज्ञ जगदीशचंद्र बोस ह्यांच्या शंभराव्या जन्मदिनानिमित्त भारत सरकारच्या बोलपट खात्यानें एक चित्रपट तयार केला आहे. त्यांनीं केलेल्या मौलिक संशोधनामुळें वनस्पति व प्राणी ह्यांच्या बाह्य जगतासंबंधीच्या संवेदना सारख्या स्वरूपाच्या असतात, असें सिद्ध झालेलें आहे.

**तेलासाठीं जपानची धडपड**—जपानमधील उद्योगधंद्यांचा व्याप वाढत असून त्यासाठी खनिज तेलाची फार गरज आहे. जपानच्या वायव्येकडील होन्शु बेटाच्या आसपासच्या समुद्रांत मोठ्या प्रमाणावर तेल सांपडेल असें जपानी संशोधकांना वाटत आहे. अमेरिकेकडून जरूर ती यंत्रसामुग्री मागवून समुद्राच्या तळाशीं विहिरी खोदण्याचें काम चालू करण्यांत आलें आहे.

**कामगारांचा आरोग्य विमा**—मद्रास राज्यांतील पांच शहरांतून कामगारांच्या आरोग्यविम्याची योजना चालू आहे. आतां आणखी चार शहरांतील कामगारांना ती लागू करण्यांत आली आहे. योजनेचा विस्तार वाढविल्यामुळें राज्यांतील आणखी २०,००० कामगारांना तिचा फायदा मिळूं लागेल.

हें पत्र पुणें पेठ शिवाजीनगर घ. नं. ९१५/१ आर्यभूषण छापखान्यांत केशव गणेश शारंगपाणी यांनीं छापिलें व श्रीपाद वामन काळे, बी. ए., यांनीं 'दुर्गाधिवास' ८२३ शिवाजीनगर (पो. ऑ. डेक्कन जिमखाना) पुणें ४ येथें प्रसिद्ध केलें.